शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं. १४/२०२२**

| | | |
|---|---|---|
| श्री.रोहित अशोक बारवडे<br>रा.प्लॉट नं.४४, लक्षचंद्र निवास,<br>महर्षि शिंदे नगर, हनूमान नगर रोड,<br>इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली | } | तक्रारदार |

विरूध्द्

| | | |
|---|---|---|
| १. अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग<br>ॲंड टेक्नॉलॉजी, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली<br><br>२. संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर,<br>ता. वाळवा, जि. सांगली | } | वि. प |

संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर, जि.सांगली या शिक्षण संस्थेचे अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली यांचेकडील शिक्षक श्री. रोहित अशोक बारवडे यांनी दि.२६/०५/२०२२ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१) मी सदर महाविद्यालयात ऑटोमोबाईल इजि. विभागात असि. प्रोफेसर या पदावर कार्यरत आहे. महाविद्यालयामध्ये दिले जाणारे वेतन हे शासन दरानुसार नसून माहे जुलै २०१६ ते जुलै २०१८ साधारणपणे २ वर्षे मिळणा-या वेतनामध्ये नियमबाहय् कपात केली गेली. तसेच कपात केलेली रक्कम महाविद्यालयाने कोठे वापरली याची मला माहिती नाही. तसेच दिले जाणारे वेतन शासन दराप्रमाणे नसून वार्षिक वेतनवाढ ही अनियमित आहे. म्हणून मला महाविद्यालयाने दिलेला पगार व शासन नियमानुसार दिले जाणारे पगार यातील फरक तसेच नियमबाहय् कपात केलेली रक्कम मिळावी. २) कोरोनाच्या काळामध्ये शोध निबंध लिहीला नाही हे कारण पुढे करून मे २०२१ महिन्याचे अर्धे वेतन नियमबाहय कपात केले हे वेतन मिळावे ३) ॲकेडमिक ईअर २०२१-२२ मध्ये रजा मिळण्यासाठी विनंती अर्ज करूनही रजा न देता दुर्लक्ष करून रजा शिल्लक असतानाही वेतनामध्ये जानेवारी २०२१, ऑगस्ट २०२१, सप्टेंबर २०२१, नोव्हेंबर २०२१ कपात केली गेली. तसेच मागच्या काळामधील ब-याच रजा

शिल्लक आहेत. म्हणून रजा शिल्लक असतानाही कपात केले गेलेले वेतन व शिल्लक राहिलेल्या पगारी रजा शिल्लक असतानाही कपात केले गेलेले वेतन व शिल्लक राहिलेल्या पगारी रजा मिळाव्यात. ४) महाविद्यालयाच्या मिळणा-या वेतनामधून एसएसएसपी मेंबर फि च्या नावाने वेतनामधून ५००/- रूपये संत ज्ञानेश्वर शिक्षण सेवकांची पतसंस्था या संस्थेमध्ये रक्कम दि.०१/०२/२०१४ पासून कपात केलेली आहे. ही कपात केलेली रक्कम मिळावी. ५) महाविद्यालयाने सन २०२०-२१ चे पेपर सेटिंगचे पैसे दिलेले नाही. ते मिळावेत. ६) वरील सर्व देयके मला सहव्याज देण्यात यावी.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. जुलै २०१६ ते जुलै २०१८ मधील पगारातून कपात केलेल्या रक्कमेबाबत महाविद्यालयाचे म्हणणे पुढील प्रमाणे आहे. माहे जुलै २०१६ मध्ये महाविद्यालयास व्यवस्थापनाने सर्व कर्मचा-यांचा महागाई भत्ता ५८ वरून ८० टक्के वाढविण्याचा निर्णय घेतला होता. परंतू शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे महागाई भत्त्याचा फरक रक्कम जुलै २०१६ ते जून २०१८ पर्यंत अदा करता आली नाही. त्यामुळे माहे जुलै २०१६ ते जून २०१८ मधील सदर पगारातील फरकाची रक्कम श्री. रोहित अशोक बारवडे यांना देण्यात आलेली नाही.

२. शासन दरानुसार पगार - सदर महाविद्यालय कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर १९९९ पासून सुरू झालेली आहे. विनाअनुदानित महाविद्यालयातील सर्व आर्थिक व्यवहाराचे गणित हे महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी संख्येवर अवलंबून असते. विद्यार्थ्यांकडून जमा होणा-या शैक्षणिक फी नुसार सर्व कर्मचा-यांचे पगार अदा केले जात असतात. श्री.बारवडे हे या महाविद्यालयातील ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग या विभागात दि.३१/०५/२०२२ पर्यंत कार्यरत होते. या अभ्यासक्रमास मागील काही वर्षात पूर्ण क्षमतेने प्रवेश झालेले नाहीत. या अभ्यासक्रमासाठी सन २०१३-१४ ते सन २०१९-२० पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश हे सरासरी ४०.४७ टक्के इतके आहेत.(सोबत त्याचा तक्ता दिला आहे.) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सदर विभाग एआयसीटीई, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मान्यतेने टप्याटप्याने बंद करण्यात आलेला आहे. ऑटोमोबाईल इंजि. या अभ्यासक्रमासाठी पूरेशी विद्यार्थी संख्या नसतानाही महाविद्यालयाने श्री.बारवडे यांना इतर विभागातील शिक्षकांप्रमाणे वेतन दिले आहे. महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पगार अदा केला जात आहे. समितीच्या माहितीकरीता उदा. माहे डिसेंबर, २०२१ व मार्च, २०२२ या दोन्ही महिन्याचे पगार पत्रक सोबत जोडले आहे.

३. नियमित वेतनवाढ - एआयसीटीई, नवी दिल्ली व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयाचे एनबीए व एनएएसी यांचेकडून ॲक्रिडीटेशन होणे गरजेचे आहे. एनआयआरफ मध्येही महाविद्यालयाचे रॅंकिग चांगले असावे, यासाठीही प्रयत्न होणे गरजेचे आहे. या सर्व शासकीय यंत्रणांच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयातील शिक्षकांनी खालील बाबी करणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पीअ रिव्हयू जर्नलमध्ये शोधनिंबध सादर करणे, आपल्या विभागामार्फत दरवर्षी किमान १० लाख रूपये एवढया रक्कमेची कन्सल्टन्सी करणे किंवा टेस्टिंग सुविधा पुरविणे, किमान तीन वर्षातून एक पेटेंट फाईल करणे. या सर्व निकषांमध्ये जास्तीत जास्त गुण प्राप्त करणे हे त्या त्या विभागातील शिक्षकांचे काम असून यामध्ये महाविद्यालय प्रशासन व व्यवस्थापन यांचा काहीही सहभाग नसतो. हे सर्व काम शिक्षकांनी स्वतः करणे गरजेचे आहे. महाविद्यालयातील शिक्षकांनी या गोष्टी नियमितपणे कराव्यात यासाठी महाविद्यालय प्रशासनाने वेळोवेळी लेखी व तोंडी सूचना दिलेल्या आहेत. तसेच सर्व शिक्षकांच्या नियुक्ती पत्राबरोबरच याची माहिती देण्यात आलेली आहे. शिक्षकांनी वरील बाबींची पूर्तता न केल्यास त्याचा परिणाम महाविद्यालयाच्या मानांकनावर होतो याची जाणीव सर्व शिक्षकांना आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर जर्नलमध्ये शोधनिंबध सादर करणे, कन्सल्टन्सी करणे टेस्टिंग, पेटेंट फाईल करणे यासाठी लागणा-या सुविधा महाविद्यालयाकडून उपलब्ध करून देण्याचा पुरेपूर प्रयत्न महाविद्यालयाकडून केला जातो. श्री.रोहित अशोक बारवडे यांनी वरील वेगवेगळया ॲक्रिडीटेशनसाठी आवश्यक असणा-या बाबींकडे यांनी वरीलपैकी कोणत्याही बाबीची पूर्तता केलेली दिसून येत नाही. याबाबत श्री.रोहित अशोक बारवडे यांना दोन वेळा, दि.०१/०२/२०२० आणि दि.२२/०६/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. सदर कारणे दाखवा नोटीस च्या छायांकित प्रती समितीच्या माहितीसाठी सोबत जोडलेल्या आहेत. सबब श्री.रोहित अशोक बारवडे यांच्या सन २०१९ ते २०२२ या कालावधीतील वेतनवाढी रोखण्यात आलेल्या आहेत.

४. कोरोना काळात शोधनिबंध लिहीला नाही हे कारण पुढे करून मे २०२१ चे अर्धे वेतन नियमबाहय् कपात केले - माहे मे २०२१ मध्ये महाविद्यालय व्यवस्थापनाकडून महाविद्यालयातील प्रत्येक शिक्षकांनी मागील तीन वर्षामध्ये केलेल्या कामाचा आढावा घेण्यात आलेला होता. प्रपत्र ६ नुसार श्री.रोहित बारवाडे यांनी समाधानकारक कामगिरी केलेली दिसून येत नाही आणि त्यामुळे त्यांचा माहे मे, २०२१ चा अर्धा पगार कपात करण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. त्यांच्या देय पगाराच्या अर्धी रक्कम त्यांच्या बॅंक खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे व उर्वरित अर्धे वेतन राखून ठेवण्यात आलेले आहे. रोहित अशोक बारवडे हे सध्या महाविद्यालयाच्या सेवेमध्ये कार्यरत नाहीत व कार्यमुक्त होण्यापुर्वी त्यांनी

महाविद्यालयात नो डयुज जमा केले नाही. सबब माहे जुलै २०१६ ते जून २०१८ मधील महागाई भत्याची रक्कम श्री.रोहित अशोक बारवडे यांना नो डयूज प्रमाणपत्र जमा केले नंतर देणेत येईल. याबाबत श्री.बारवडे यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करावी.

५. ॲकडमिक ईअर २०२१-२२ मध्ये रजा मिळण्यासाठी विनंती अर्ज करूनही रजा न देता दुर्लक्ष करून रजा शिल्लक असतानाही वेतनामध्ये जानेवारी २०२१, ऑगस्ट २०२१, सप्टेंबर २०२१, नोव्हेंबर २०२१ कपात केली गेली. तसेच मागच्या काळामधील ब-याच रजा शिल्लक आहेत. म्हणून रजा शिल्लक असतानाही कपात केले गेलेले वेतन व शिल्लक राहिलेल्या पगारी रजा शिल्लक असतानाही कपात केले गेलेले वेतन व शिल्लक राहिलेल्या पगारी रजा मिळाव्यात- महाविद्यालयाने प्राध्यापकांना रजा देण्यासाठी ठरावीक पध्द्त राबविली जात आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपली रजा प्रथम संबधित विभाग प्रमुख आणि त्या नंतर मा.संचालकाकडून मंजूर करून घेतल्यानंतरच सदर रजा मान्य केली जाते. त्यामुळे एकदा मंजूर झालेली रजा बिनपगारी होण्याचा प्रश्नच उदभ्वत नाही. श्री.बारवडे यांनी जोडलेल्या रजेच्या रेकॉर्डवरून दिसून येते की त्यांनी त्यांची कोणतीही रजा मा.संचालकाकडून मंजूर करून घेतलेली नाही. सबब त्यांच्या रजा बिनपगारी करण्यात आलेल्या आहेत. तसेच सन २०२१-२२ मध्ये नियमानुसार देय असणा-या रजा दिल्या जाणार नाहीत अश्या प्रकारच्या सूचना महाविद्यालयाकडून देण्यात आलेल्या नाहीत. २०२१-२२ मधील ऑटोमोबाईल इंजिनियरिंग या अभ्यास क्रमामधील इतर प्राध्यापकाना रजा मंजूर केलेल्या आहेत.

६. वेतनातून एसएसएसपी मेंबर फि च्या नावाने कपात केलेबाबत - संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेमध्ये कार्यरत असणारे सर्व कर्मचारी संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, आष्टा या पतसंस्थेचे सभासद असतात. या पतसंस्थेमार्फत सर्व सभासदांना कमी व्याजदरात रू.५ लाख पर्यंत विनातारण व तातडीने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. प्रत्येक सभासदाकडून प्रति महिना रू.५००/- एवढी रक्कम संस्थेच्याशेअर्सपोटी त्यांच्या मासिक वेतनातून कपात करून पतसंस्थेकडे वर्ग केली जाते. श्री.बारवडे हे या पतसंस्थेचे सभासद आहेत व त्यांनी पतसंस्थेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिल्यास ही रक्कम त्यांना पतसंस्थेकडून परत मिळूशकते. सबब श्री.बारवडे यांनी पुढील कार्यवाहीसाठी श्री. सुनिल शिनगारे, चेअरमन, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था सेवकांची पतसंस्था मर्यादित, आष्टा यांचेशी संपर्क साधावा.

७. महाविद्यालयाने सन २०२०-२१ चे पेपर सेटिंगचे पैसे दिलेले नाही ते मिळावेत- याबाबत तक्रारदार यांनी महाविद्यालयाच्या परिक्षा विभागाशी संपर्क साधून योग्य त्या कागदपत्रांची (पेपर सेटींग ची ऑर्डर व

पेपर जमा केल्याची पावती) पूर्तता करावी, जेणेकरून तक्रारदार यांना पेपर सेटिंगचे बिल प्रलंबित असल्यास अदा करणे सोयीचे होईल.

८. वरील सर्व देयके मला सहव्याज देण्यात यावी- याबाबत तक्रार निवारण समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

**समितीची निरिक्षणे :**

सदर प्रकरणी अर्जदार स्वतः व जाबदारांतर्फे त्यांचे प्रतिनिधी रजिस्ट्रार डॉ. हिवरेकर यांचे युक्तीवाद ऐकूण घेण्यात आले. तसेच अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. तक्रारदाराने आपली तक्रार विविक्षीत मुद्यांमध्ये मांडलेली असून त्यास गैर अर्जदारांतर्फे मुद्येसूद उत्तरे देण्यात आलेली आहेत. त्यामुळे तक्रारदाराच्या प्रत्येक मुद्यांचे स्वतंत्र विवेचन त्यावरील समितीचा ठराव खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

१. तक्रारदाराचा पहिला मुद्या असा आहे की, माहे जुलै, २०१६ ते जुलै, २०१८ या काळात साधारणपणे मिळणाऱ्या वेतनात नियमबाहय् कपात केली. तसेच दिले गेलेले वेतन हे शासन दराप्रमाणे नसून वार्षिक वेतनवाढ देखील अनियीमत आहे. सबब त्यांना महाविद्यालयाने दिलेला प्रत्यक्ष पगार व शासन नियमानुसार दिला जाणारा पगार यातील फरक व नियमबाहय कपात केलेली रक्कम त्यांना मिळावी.

महाविद्यालयाच्या अभिप्रायानुसार माहे जुलै, २०१६ मध्ये महाविद्यालय व्यवस्थापणाने सर्व कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता जुलै, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने ५८ टक्के वरून ८० टक्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला होता व तशी कार्यवाही देखील करण्यात आली आहे. परंतू शैक्षणिक वर्ष २०१६ पासून विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे महागाई भत्याच्या फरकाची रक्कम जुलै, २०१६ ते जून, २०१८ पर्यंत अदा करता आली नाही. त्यामुळे तक्रारदारास पगारातील फरकाची रक्कम देण्यात आलेली नाही. तसेच सदरचे महाविद्यालय विनाअनुदानीत तत्वावर सुरू असून त्याचे सर्व आर्थिक व्यवहाराचे गणित प्रवेशित विद्यार्थी संख्येवर अवलंबून असते व त्यांचेकडून जमा होणाऱ्या शैक्षणिक फी नुसार सर्व कर्मचाऱ्यांचे पगार अदा केले जात असतात. सन २०१३-१४ ते २०१९-२० या काळात विद्यार्थी प्रवेश क्षमता ६० च्या प्रमाणात केवळ ४०-४७ येवढेच प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेश झालेले असून तक्रारदार काम करत असलेला Auto mobile Engineering हा विभाग शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासुन AICTE नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मान्यतेने टप्याटप्याने बंद करण्यात आलेला आहे. पुरेशी विद्यार्थी संख्या Auto mobile Engineering या अभ्यासक्रमासाठी

नसताना देखील महाविद्यालयाने तक्रारदारांना, इतर विभागातील शिक्षकांप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पगार दिलेला आहे. तसेच NBA व NAAC यांचे ॲक्रीडेशन होण्याकरिता तसेच NIRF मध्ये महाविद्यालयाचे चांगले रॅकींग असावे या करीता असणाऱ्या मार्गदर्शक तत्वानुसार शिक्षकांनी करावयाच्या नेमूण दिलेल्या बाबी तक्रारदारांनी जाणीव पूर्वक दुर्लक्षीत केलेल्या आहेत आणि त्यापैकी कोणत्याही बाबींची पूर्तता केली नाही हे दिसून येत असल्याने दि.०१/०२/२०२० व दि. २२/०६/२०२१ रोजी तक्रारदारांना "कारणे दाखवा" नोटीसा देऊन सन २०१९ ते २०२२ या कालावधीतील वेतनवाढी रोखण्यात आलेल्या आहेत.

तक्रारदारातर्फे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या रिट पिटीशन नंबर ११०९१/२०१० व इतर भारतीय कामगार सेना व इतर विरूध्द् University Grants Commission व इतर या प्रकरणातील दि.१०/०२/२०१२ या प्रकरणातील निकालाचा आधार घेण्यात आला. त्या प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या इतर प्रकरणातील निकालांचा व कायदयातील तरतुदींचा विचार करून असे नमुद केले आहे की, विनाअनुदानीत महाविद्यालये देखील आपल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या श्रेणी वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार वेतनश्रेणी देण्यास बांधील आहेत. वस्तुतः तक्रारदाराची तक्रार त्याला सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करण्यात आलेल्या नाहीत अशी नाही. त्यामुळे उपरोक्त न्यायनिर्णयांचा आधार या कामी लागू पडत नाही असे समितीचे मत आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीमध्ये वेतनातून नियमबाहय् रक्कम कपात करण्यात आल्याचे नमूद केले आहे. परंतू वेतनातून कपात केलेली रक्कम कोणती आणि कपात केलेली रक्कम महाविद्यालयाने कोठे वापरली याची कोणतीही स्पष्टता केलेली नाही. तथापि जाबदार यांनी याबाबत कपात केलेली रक्कम ही महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे महागाई भत्याचा फरक जुलै, २०१६ ते जुलै, २०१८ पर्यंत अदा करता आला नाही व त्यामुळे त्यांच्या वेतनातील फरकाची रक्कम देण्यात आलेली नाही असे स्पष्टीकरण याबाबत दिलेले आहे. समितीने उपरोक्त दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेतले असता, तक्रारदाराला माहे जुलै, २०१६ ते जुलै, २०१८ या कालावधीकरीता महागाई भत्ता देता येऊ शकला नाही, ही बाब जाबदारांनी मान्य केली आहे. आणि त्याचे कारण प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे महागाई भत्याच्या फरकाची रक्कम देता आली नाही असे महाविद्यालयाचे कथन आहे. हे कारण कोणत्याही दृष्टीने कायदेशीर असू शकत नाही. महागाई भत्याच्या फरकाची रक्कम रोखण्याचे कोणतेही कायदेशीर कारण या समितीस आढळून येत नाही. सबब जाबदार यांच्या म्हणण्यानुसार तक्रारदार यांच्या वेतनामध्ये महागाई भत्याच्या फरकाची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यास अनुसरून तक्रारदारास लागू असणा-या ८० टक्के दराने

महागाई भत्यानुसार त्यातील फरकाची जुलै, २०१६ ते जूलै, २०१८ या काळातील फरकाची रक्कम देण्याची जबाबदारी जाबदार यांची आहे असे या समितीचे मत आहे.

महाविद्यालयाच्या कथनानुसार महाविद्यालयातील शिक्षक/कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे आणि त्यानुसार त्यांना पगार देखील देण्यात आलेला आहे. तथापि तक्रारदार यांनी समितीसमोर दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केलेनुसार नियुक्ती आदेशानुसार त्यांना वेतन मिळत नाही. तसेच नेमणूक आदेश हा तक्रारदार आणि वि.प. यांच्यातील करार असून या नेमणूक आदेशात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याची जबाबदारी वि.प. यांचेवर आहे. सबब समिती या निष्कर्षास येते की, तक्रारदार यांच्या नियुक्ती आदेशामध्ये नमूद केलेनुसार पूर्ण वेतन देण्याची जबाबदारी संस्था व महाविद्यालय यांची आहे.

सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीतील वेतनवाढी तक्रारदारांच्या काही त्रुटीमुळे रोखण्यात आलेल्या आहेत असे जाबदारांचे म्हणणे आहे. ही वेतनवाढ रोख कायमस्वरूपी असल्याचे जाबदार म्हणत नाहीत व तसे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येत नाही. त्यामुळे सदरची वेतनवाढ रोखणे किरकोळ शिक्षा असल्याचे दिसून येते. ती शिक्षा अंमलात आणण्याकरीता आवश्यक ती प्रक्रिया म्हणजे तक्रारदाराला "कारणे दाखवा" नोटीस देऊन त्याचे स्पष्टीकरण मांडण्याची संधी देऊन सदरची किरकोळ शिक्षा फर्माविल्याचे दिसते. ही काही कायमस्वरूपी शिक्षा नाही. जर या शिक्षेपोटी तक्रारदाराची वेतन वाढ रोखण्यात आली असेल आणि त्यामुळे त्याला आपल्या वेतनात कपात झाली आहे असे वाटत असेल तर तक्रारदाराचा हा आरोप चुकीचा आहे. तक्रारदार यांना जुलै, २०१६ ते जुलै २०१८ या कालावधीकरीता देय असणाऱ्या दराप्रमाणे महागाई भत्ता मिळालेला नाही. त्या फरकाची रक्कम तो मिळण्यास पात्र आहे. सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीकरीता वेतनवाढ रोख ही किरकोळ शिक्षेचा भाग असून ती कायदेशीर प्रक्रिया अवलंबून फर्माविण्यात आलेली किरकोळ शिक्षा आहे. त्याबद्दलचा उजर तक्रारदाराला करता येणार नाही. तसेही, त्या पुढील काळाकरीता भविष्यातील वेतनवाढी मिळण्यास तक्रारदार, सदर किरकोळ स्वरूपाच्या शिक्षेमुळे पात्र ठरलाच असता. ही तक्रार दाखल केल्यानंतर म्हणजे दि.३१/०५/२०२२ रोजी तक्रारदारांना सेवेतून मुक्त करण्यात आलेले आहे. सदरची तक्रार दि.२६/०५/२०२२ रोजी दाखल केली असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यास पुढील वेतनवाढ मिळण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

२. तक्रारदाराचा दुसरी मागणी अशी आहे की, मे २०२१ या महिन्याचे अर्धे वेतन शोध निबंध लिहीला नाही हे कारण पुढे करून नियमबाह्य् करून कपात केलेले आहे व ते वेतन त्यास मिळावे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

सदर बाबतीत जाबदार यांचे म्हणणे असे की, माहे मे, २०२१ मध्ये महाविद्यालयात व्यवस्थापनाकडून महाविद्यालयातील प्रत्येक शिक्षकांसोबत तक्रारदारांचा देखील मागील ३० वर्षामधील केलेल्या कामाचा आढावा प्रपत्रकानुसार घेण्यात आला होता. त्यानुसार तक्रारदारांनी सर्वच बाबींमध्ये समाधानकारक कामगिरी केलेली दिसून न आल्यामुळे त्यांचा माहे मे, २०२१ चा अर्धा पगार कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार त्यांच्या देय पगाराची अर्धी रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली व उर्वरित वेतन राखून ठेवण्यात आलेले आहे. तक्रारदार सध्या सेवेत नाहीत आणि कार्यमुक्त होण्यापूर्वी त्यांनी महाविद्यालयामध्ये No dues दाखला जमा केलेला नाही. सबब जुलै, २०१६ ते जून, २०१८ मधील महागाई भत्त्याची रक्कम हा दाखला तक्रारदारांनी दाखल केल्यानंतर त्यांना देण्यात येईल.

मे, २०२१ मध्ये तक्रारदारांचे अर्धे वेतन कपात करण्यात आले असल्याची बाब जाबदार यांनी मान्य केली आहे. त्याबद्दलची कारणे देखील जाबदार यांनी दिलेली आहेत. त्या कारणांवरून सदरची वेतन कपात तक्रारदाराने केलेल्या सेवेतील त्रुटीबाबत दिलेली शिक्षा असल्याचे दिसून येते. अर्धे वेतन रोखणे हे कोणत्या स्वरूपाची शिक्षा आहे, ती कोणत्या नियमात बसते, त्या शिक्षेकरिता कोणती प्रक्रिया पार पाडावी लागते, कोणत्या नियमानुसार महाविद्यालयीन व्यवस्थापन आपल्या स्तरांवर अर्धे वेतन रोखण्याचा निर्णय घेऊ शकते याबाबतींचा समाधानकारक खुलासा जाबदारांकडून करण्यात आलेला नाही. सबब सदरचे अर्धवेतन रोखणे ही कृती हे बेकायदेशीर असल्याचे दिसून येते. सबब तक्रारदार माहे मे, २०२१ च्या राखून ठेवलेल्या अर्ध्या वेतनास पात्र आहे असा या समितीचा निर्णय आहे.

३. तक्रारदाराची तिसरी मागणी अशी आहे की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या काळामध्ये रजा शिल्लक असतानाही विनंती अर्ज करूनही रजा मंजूर न करता जानेवारी २०२१, ऑगस्ट २०२१, सप्टेंबर २०२१, आणि नोव्हेंबर २०२१ या कालावधीतील वेतनामधून वेतन कपात केली गेली. त्या कपात केलेल्या रजेच्या कालावधीचे वेतन त्यास मिळावे. तक्रारदाराने मागितलेल्या सदर काळातील रजा, रजा शिल्लक नसतानाही मंजूर केलेल्या नाहीत व त्या काळाचे वेतन कपात केलेले आहेत ही बाब महाविद्यालयाने नाकारलेली नाही. तथापि महाविद्यालयाचे म्हणणे असे आहे की, प्राध्यापकांना रजा देण्यासाठी एक ठरावीक पद्धत राबविली जाते. त्यानुसार प्रत्येकाने प्रथम आपली रजा संबंधीत विभाग प्रमुख आणि त्यानंतर संचालकाकडून मंजूर करून घ्यावी आणि त्यानंतरच रजा मंजूर होते आणि तक्रारदाराने अर्जासोबत जोडलेल्या रजेचे रेकॉर्डवरून हे स्पष्टपणे दिसून येते की त्यांनी त्यांची कोणतीही रजा संचालकाकडून मंजूर करून घेतलेली नाही. सदरची बाब प्रपत्र ७ चे जाबदारांनी दाखल केलेले आहे. त्यावरून स्पष्टपणे शाबीत होत आहेत. तसेही पाहता रजा हा कोणत्याही कर्मचाऱ्यांचा हक्क नाही. रजा देणे- न देणे हे सर्वस्वी व्यवस्थापनाच्या अखत्यारितील बाब असते. जेंव्हा रजेची मागणी

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

नियमांच्या अधीन राहून केली जाते आणि ती नाकारली जाते तेव्हा, त्याबाबत काही उजर केला जाऊ शकतो पण जेंव्हा रजेची मागणी ही नियमानुसार नसेल आणि ती नाकारली गेली असेल आणि परिणामतः ते विना वेतनी रजा धरून वेतन कापले गेले असेल तर कर्मचाऱ्याला त्या रजेचा पगार मागण्याचा हक्क मिळत नाही. त्यामुळे तक्रारदाराची ही मागणी समितीस मंजूर करता येत नाही.

४. तक्रारदाराची चौथी मागणी अशी आहे की, महाविद्यालयातून मिळणाऱ्या वेतनामधून संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेमध्ये कार्यरत असणाऱ्या सेवकांच्या सहकारी पतसंस्था मर्यादित, आष्टा या संस्थेच्या मेंबरशिपच्या नावाने दरमाह रू.५००/- इतकी रक्कम दि ०१/०२/२०१४ पासून कपात केलेली असून ती कपात केलेली रक्कम त्यास मिळावी. याबाबत जाबदारांचे म्हणणे असे की सदर शिक्षणसंस्थेमध्ये कार्यरत असणारे सर्व कर्मचारी, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, आष्टा या पतसंस्थेचे सभासद असतात व प्रत्येक सभासदांकडून प्रति महिना ५००/- रू. एवढी रक्कम संस्थेच्या शेअर्स पोटी त्यांच्या मासिक वेतनातून कपात करून पंतसंस्थेकडे वर्ग केली जाते. तक्रारदार त्या पतसंस्थेचे सभासद आहेत आणि त्या पतसंस्थेचा सभासदत्वाचा राजीनामा तक्रारदाराने दिल्यास कपात केलेली रक्कम त्यांना पतसंस्थेकडून मिळू शकते. त्याकरिता तक्रारदारांनी त्या पतसंस्थेच्या चेअरमनशी संपर्क साधवा.

या समितीने तक्रारदारास याबाबतीत सदर पतसंस्थेशी संपर्क करून त्या पतसंस्थेच्या सभासदत्त्वाचा राजीनामा देऊन आपली कपात केलेली रक्कम परत मिळविण्याकरिता कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. कारण सदरची पतसंस्था ही या समितीच्या कार्यक्षेत्रात येत नाही. पतसंस्थेकरिता केलेली कपात ही महाविद्यालयाने कपात केलेली नसते. ती पतसंस्थेकरीता म्हणून निर्माण केलेली सोयीची व्यवस्था असते या सूचनेचे पालन तक्रारदाराने सदर पतसंस्थेकडे दि.१३/११/२०२३ रोजी आपल्या सदर पतसंस्थेच्या सभासदत्त्वाचा राजीनामा देऊन व सदर शेअर्स पोटी जमा केलेली रक्कम व त्यावरील व्याजाची मागणी करून केलेली आहे. सदरची राजीनाम्याची प्रत तक्रारदाराने या समितीपुढे दि.२३/११/२०२३ रोजी हजर केलेली आहे. तथापि मागणी केलेली रक्कम व त्यावरील व्याज त्याच्या खात्यात वर्ग झाली आहे किंवा नाही याबद्दल या समिती पुढे काही एक निवेदन दिलेले नाही. सदरची पतसंस्था या तक्रारीला पक्षकार नाही. ती या समितीच्या कार्यक्षेत्रात येत नाही. सबब त्या पतसंस्थेविरूद्ध या समितीला काही आदेश पारीत करता येत नाहीत. पतसंस्थेच्या सभासद असणाऱ्या कर्मचाऱ्याला पतसंस्थेची वर्गणी नियीमत भरण्याची कायदेशीर जबाबदारी ही सभासदावर असते. अशी वर्गणी भरणे सोयीचे जावे म्हणून पतसंस्था आणि शिक्षणसंस्था/महाविद्यालय यांच्यामध्ये कर्मचाऱ्याला वेतन प्रदान करीतेवेळी त्या वेतनातून ती सभासद फी काढून घेऊन पतसंस्थेत जमा करण्याची व्यवस्था

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

ठरलेली असते. ती महाविद्यालयाची कायदेशीर जबाबदारी नसते किंवा महाविद्यालय/संस्था स्वतःकरीता ती रक्कम वसूल करू शकत नाही. पतसंस्थेची प्रतिनिधी म्हणून ती रक्कम कर्मचाऱ्यांकडून जमा करून घेतली जाते. त्यामुळे अशी जमा करून घेतलेली रक्कम परत करण्याची जबाबदारी ही संस्था/महाविद्यालय यांच्याकडे नसते. पतसंस्थेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिल्यानंतर जर अशा सभासदाला अशा जमा करून घेतलेल्या रक्कमा वसूल करून घेण्याचा कायदेशीर हक्क असेल तर तो हक्क पतसंस्थे विरूद्ध आहे व तो हक्क बजावण्याकरीता वेगळे न्यायासन देखील आहेत. सबब तक्रारदाराची ही मागणी ही समिती मान्य करू शकत नाही.

५. तक्रारदाराचा पाचवा मुद्दा असा आहे की, महाविद्यालयाने सन २०२०-२१ चे पेपर सेटिंगचे पैसे दिलेले नाही ते मिळावे. त्याबाबत जाबदारांनी तक्रारदारांनी महाविद्यालयाच्या परिक्षा विभागाशी संपर्क साधून योग्य त्या कागदपत्रांची (पेपर सेटिंग ऑर्डर व पेपर जमा करण्याची पावती) पूर्तता करावी जेणेकरून तक्रारदार यांना पेपर सेटिंगचे बील प्रलंबित असल्यास अदा करणे सोयीचे जाईल असे म्हंटलेले आहे. तक्रारदाराची तक्रार किंवा त्याने दाखल केलेले शपथपत्र यामध्ये कुठेही असे ठाम प्रतिपादन नाही की सन २०२०-२१ मध्ये त्याने पेपर सेट केले होते. कोणत्या विषयाचे पेपर सेट केले होते, किती पेपर सेट केले होते, प्रत्येक पेपरचे किती पैसे त्यास येणे होते, एकूण किती पैसे त्यास येणार होते याचे कोणतेही स्पष्ट निवेदन तक्रारदाराने केलेले नाहीत आणि तितक्याच मोघमपणे जाबदारांनी त्यावर आपले उत्तर दिलेले आहे. अशा मोघम स्वरूपाच्या पक्ष कथनावरून सदर तक्रार शाबीत झाले असे म्हणणे योग्य होणार नाही. सबब तक्रारदारांची ही मागणी मान्य करता येत नाही असा या समितीचा निष्कर्श आहे.

६. तसेच तक्रारदारांनी सर्व देयके ही आपणास सहव्याज देण्यात यावी अशी मागणी अर्जात नमूद केली आहे. याबाबत समितीचे मत असे की, व्याज देण्याच्या तरतूदीची बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

वरील सर्व निष्कर्शावरून हे स्पष्ट होते की, प्रस्तुतची तक्रार अंशतः मंजूर करावी लागेल. तक्रारदार केवळ जुलै, २०१६ ते जुलै, २०१८ या कालावधीकरिता देय असणाऱ्या दराप्रमाणे ८० टक्के महागाई भत्ता व प्रत्यक्षात दिलेला ५८ टक्के महागाई भत्त्याची रक्कम यातील फरकाची रक्कम मिळण्यास तो पात्र आहे. तसेच जाबदारांनी माहे मे, २०२१ महिन्याकरीता बेकायदेशीररित्या कपात केलेले तक्रारदाराचे अर्धे वेतन तक्रारदारास अदा करणे आवश्यक आहे. तसेच समितीच्या उपरोक्त

निरिक्षणामधील मुद्या कं. ३ ते ६ या तक्रारदार यांच्या मागण्या नामंजूर कराव्या लागतील असा या समितीचा निष्कर्ष आहे. सबब समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

१. जाबदारांनी तक्रारदारास जुलै, २०१६ ते जुलै २०१८ या कालावधीकरीता देय असणाऱ्या ८० टक्के दराप्रमाणे महागाई भत्ता व प्रत्यक्षात ५८ टक्के दराने दिलेला महागाई भत्ता यातील फरकाची रक्कम सदर आदेश प्राप्त झालेल्या तारखेपासून ३ महिन्यात अदा करावी.

२. जाबदारांनी तक्रारदारांस त्यांच्या माहे मे, २०२१ या महिन्याच्या वेतनातून बेकायदेशीररित्या कपात केलेले अर्धे वेतनाची रक्कम सदर आदेश प्राप्त झालेल्या तारखेपासून ३ महिन्यात अदा करावी.

३. तसेच समितीच्या उपरोक्त निरिक्षणामधील मुद्या कं. ३ ते ६ या तक्रारदार यांच्या मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 2 6 MAR 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.